HEADS UP VENTURES LIMITED

CIN: L52390MH2011PLC213349
Registered Office: Plot No. E-132, MIDC, Tarapur Industrial Area, Boisar, Dist : Palghar – 401506

21st August, 2024

To,	To,
BSE Limited	**The National Stock Exchange of India Limited**
Phiroz Jeejeebhoy Towers,	Exchange Plaza, 5th Floor, Plot No.C-1,
Dalal Street,	G Block, Bandra Kurla Complex,
Mumbai 400 001.	Bandra (East), Mumbai 400 051.

Dear Sir/ Madam,

Sub: Newspaper advertisement of Notice of the 13th Annual General Meeting, Closure of Register of Members, and Share Transfer Books and Remote E-Voting

Ref: BSE Scrip Code: 540210 and NSE Symbol HEADSUP

The Company has published Newspaper Advertisements informing about the 13th Annual General Meeting ('AGM') of the Company to be held on Thursday, 12th September, 2024 in Financial Express (English) editions dated 21st August, 2024 and Mahasagar (Marathi) edition dated 21st August, 2024 containing, *inter-alia*, the following details:

1. Day, Date, Time and venue of 13th AGM;
2. Date of dispatch of notice of 13th AGM and Annual Report for the Financial Year 2023-24 to the Members of the Company;
3. Period of closure of Register of Members and Share Transfer Books for the purpose of AGM; and
4. Remote e-voting period.

Pursuant to the provisions of Regulation 30 and 47 read with Part A of Schedule III of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed herewith copies of the Newspaper Advertisements published in the aforementioned newspapers.

Kindly take the above on your records and oblige.

Thanking you,
Yours faithfully,
for **HEADS UP VENTURES LIMITED**

HANSRAJ RATHOR
Digitally signed by HANSRAJ RATHOR
Date: 2024.08.21 12:54:49 +05'30'

HANSRAJ RATHOR
Managing Director
DIN 07567833

Encl: As above

निलेश सांबरेंना बांधली हजारो बहिणींनी प्रेमाची राखी!

जव्हार, दि. २० प्रतिनिधी

जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्यावतीने दरवर्षी एक राखी समाजकार्यासाठी या संकल्पनेखाली विक्रमगड तालुक्यातील झडपोली येथील जिजाऊ संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांच्या निवासस्थानी एक अनोखे रक्षाबंधन पार पडते.याही वर्षी या रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कुठेलेही रक्ताचे नाते नसताना केवळ सामाजिक जाणीवेच्या भावनेतून पालघर जिल्ह्यात असलेल्या विक्रमगड तालुक्यातील झडपोली गावाच्या जिजाऊ नगरीत दरवर्षीप्रमाणे याही वर्षी एक राखी समाजकार्यासाठी या उपक्रमाच्या माध्यमातून निलेश सांबरे या आपल्या आपुलकीच्या नात्याने बांधलेल्या भावासाठी ठाणे, मुंबई,पालघर,रायगड,रत्नागिरी आणि अगदी सिंधुदुर्ग या जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने बहिणी रक्षाबंधन करायला या ठिकाणी आलेल्या होत्या . त्यामुळे हा सोहळा पाहताना बहीण भावाच्या पवित्र नात्याचा सण असलेला हा दिवस खऱ्या अर्थाने झडपोलीतील जिजाऊ नगरीत आज संपन्न झाल्याचे अनेकांनी म्हटले आहे. याहीवर्षी हजारोंच्या संख्येने तीच बहिणींची आपुलकीची गर्दी निलेश सांबरे यांना रक्षाबंधन करण्यासाठी जमलेली पाहायला मिळाली. जिजाऊ शैक्षणीक व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून गेली 15 आरोग्य , शिक्षण , रोजगार , महिला सक्षमीकरण आणि शेती या पंचसूत्रीवर संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे हे स्व :खर्चाने कार्य करत आहेत. या माध्यमातून अनेक मोफत उपक्रम ते राबवत आहेत . ज्याचा लाभ अनेक नागरिकांना होत आहे.तर महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत आजवर हजारो स्त्रियांना जिजाऊ संस्थेच्या माध्यमातून निलेश सांबरे यांनी भावासारखे पाठीशी खंबीरपणे उभे राहत आधार दिला आहे.त्यांना स्वयंम रोजगाराचे मोफत प्रशिक्षण देऊन व्यवसायासाठी पाठबळ देत सहकार्य केले आहे.अनेक महिलांचे कोलमडलेले संसार त्यांनी उभे केले आहेत.अनेक अश्या सामाजिक जाणीवेच्या नात्यातून बांधलेल्या बहिणींच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलली आहे.त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेतली आहे.याच निस्वार्थी समाजकार्याची,केलेल्या मदतीची जाणीव ठेवून दरवर्षी अश्या हजारो महिला निलेश सांबरे यांना राखी बांधण्यासाठी येत असतात याहीवर्षी तीच हजारो बहिणींची गर्दी निलेश सांबरे यांच्या निवासस्थानी पाह्यला मिळाली .

यावेळी उपस्थित महिलांना जिजाऊ शैक्षणीक व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून एक भाऊ म्हणून आपण सर्वोतोपरी मदत करू असे आश्वासन निलेश सांबरे यांनी उपस्थित असलेल्या प्रत्येक बहिणीला देउन मायेची भेट देत त्यांच्या बरोबर भोजन करत आपल्या लाडक्या बहिणीची आपुलकीने पाठवणी केली.

श्रद्धा वालकर हत्याकांड : दोन वर्षांपासून वालकर कुटंबीय न्यायाच्या प्रतीक्षेत, फास्ट ट्रॅक कोर्टातही विलंब

वसई, दि. २० प्रतिनिधी

वसईतील श्रध्दा वालकरचे आफताब पुनावाला ने खून करुन असंख्य तुकडे केले होते,संपूर्ण देशाला हादरवून टाकणाऱ्या या घटनेचा फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला सुरु असून,गेली दोन वर्षे वालकर कुटुंबीय न्यायाची वाट पहात आहेत.

श्रद्धा वालकर या तरुणीची २०२२ मध्ये प्रियकर आफताब पुनावाला याने दिल्लीत निर्घृण हत्या करून तिच्या मृतदेहाचे असंख्य तुकडे केले होते.श्रध्दाच्या खूनानंतर महिनाभराने उघड झालेल्या या घटनेमुळे संपूर्ण देश ढवळून निघाला होता. श्रद्धाचे वडील विकास वालकर गेल्या दोन वर्षापासून न्यायाची प्रतिक्षा करत या प्रकरणाचा पाठपुरावा करीत आहेत.या विरोधात लढा उभारण्यासाठी आणि मुलींमध्ये जनजागृती करण्यासाठी त्यांनी श्रद्धा वालकर चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना केली आहे,रविवारी वसईत या ट्रस्टचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी माजी खासदार किरीट सोमय्या श्रद्धा वालकर प्रकरणी न्यायालयात लढणाऱ्या ॲड सीमा कुशवाह,मुलींमध्ये जनजागृती करणा-या जाणीव संस्थेचे मिलींद पोंक्षे,माजी महापौर प्रवीण शेट्टी उपस्थित होते.

अशा हत्याकांडा विरोधात देशभरातून संताप व्यक्त होत असतानाही,जलतगती न्यायालयात ही विलंब होत आहे. अनेक तांत्रिक गोष्टीमुळे निकाल लवकर लागत नाही.विलंबामुळे श्रद्धाच्या मृतदेहाचे अवयव तिच्या कुटुंबीयांना अंत्यसंस्कारासाठी मिळू शकले नाही अशी खंत यावेळी सीमा कुशवाह यांनी व्यक्त केली. निर्भया सामूहिक बलात्कार आणि हत्या प्रकरणात ज्या प्रकारे चौघांना फाशीची शिक्षा देण्यात आली. त्याप्रमाणे श्रद्धा वालकर प्रकरणात न्याय मिळवून देणार,असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.तर सामाजिक कार्यांबरोबर मुलींमध्ये जनजागृती करणे,त्यांचे समुपदेशन करणे आणि त्यांना कायदेशीर मदत मिळवून देण्यासाठी श्रद्धा वालकर चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना करण्यात आल्याची माहिती विकास वालकर यांनी यावेळी दिली.

बोगस पोलीस अधिकारी बनून पालिकेच्या कर्मचाऱ्याने केली लाखोंची लूट

वसई, दि. २० प्रतिनिधी

बोगस पोलीस अधिकारी बनून वसई-विरार महापालिकेच्या आरोग्य विभागातील कर्मचा-याने नागरिकांना ब्लॅक मेल करत चार लाखांहून अधिक रुपयांची लुट केल्याचा प्रकार उघड झाला आहे.

वसईरोड शहराच्या स्कायवॉकवर अनेक जोडपी गप्पा मारत उभी असतात,तसेच शेकडो ज्येष्ठ नागरिक वाहनांचा ससेमिरा चुकवण्यासाठी या स्कायवॉकचा वापर करत असतात.ही बाब हेरुन एक इसम आपण पोलीस अधिकारी असल्याची बतावणी करत जोडप्यांचे चित्रण करायचा,त्यानंतर या चित्रणाद्वारे त्यांना ब्लॅकमेल करुन लाखो रुपये उकळायचा.तर जेष्ठ नागरिकांना ही आपण ोलीस निरिक्षक जगताप असल्याची बतावणी करुन तो लुटायचा. अखेर त्याच्या कारवायांना कंटाळून एका व्यक्तीने माणिकपुर पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्याच्या तक्रारीरुन वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजू माने यांनी खातरजमा करुन राहूल मोरे या इसमाच्या मुसक्या आवळल्या.

या राहूल मोरे ने तक्रारदाराला ब्लॅकमेल करत त्याच्याकडून आठवडाभरात ३ लाख ६० हजार रुपये उकळले होते.अशा प्रकारे मोरे याने आणखी कोणाची फसवणूक केली आहे का याचा तपास पोलीसांनी केल्यावर आणखी एक तक्रारदार पुढे आला आहे.त्याच्याकडूनही मोरे ने ५३ हजार रुपये उकळल्याचे उघड झाले आहे.राहुल मोरे हा वसई-विरार महापालिकेच्या आरोग्य विभागात कायम कामगार होता. वालईपाडा येथील निवारा केंद्रात कार्यरत असताना त्याने एका वृद्धेचे दागिने हडप केले होते. अशा आर्थीक फसवणूकीच्या गुन्ह्यांमुळे त्याला पालिकेतून निलंबीत करण्यात आले आहे. निलंबनाच्या काळात त्याने जोडप्यांना आणि जेष्ठांना लुटण्याचा धंदा सुरु केला आणि अडकला.त्याने अशा प्रकारचे गुन्हे पेल्हार,नायगाव, वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दित केल्याची शक्यता असल्यामुळे त्यादृष्टीने तपास करण्यात येत असल्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजू माने यांनी सांगितले.

पालघर जिल्ह्यातील कामगारांची ठेकेदारांकडून पिळवणूक

कामगार उपायुक्तांकडे तक्रार

वसई, दि. २० प्रतिनिधी

पालघर जिल्ह्यातील कामगारांची ठेकेदारांकडून पिळवणूक होत असून,त्यांना सुरक्षेसह किमान वेतनही मिळत नसल्याची तक्रार कामगार नेते विनायक निकम यांनी कामगार उपायुक्तांकडे केली आहे.

पालघर जिल्ह्यात बोईसर-तारापूर,वाडा,डहाणू आणि वसई या भागात छोटे मोठे सुमारे सव्वा लाख कारखाने आहेत.त्यापैकी बहुतांश कंपनीत ठेका कामगार पध्दतीने काम दिले जाते.त्यांची ठेकेदारांकडून सर्व बाबतीत पिळवणूक करण्यात येत आहे. कंत्राटी कामगार कायद्यानुसार कामगारांना किमान वेतन कायदा लागू करण्यात आलेला आहे. मात्र,त्यानुसार कामगारांना वेतन देण्यात येत नाही.या कायद्यानुसार किमान वेतन दिल्यास प्रती वर्षी कामगार कायद्याप्रमाणे वेतनात वाढ करावी लागेल,ही बाब हेरुन ठेकेदार वेतन वाढ टाळत आहे.२० कामगारांपेक्षा जास्त कामगार असलेल्या कंपनीने त्यांना भविष्य निर्वाह निधी देणे बंधनकारक आहे. मात्र,त्याचीही पुर्तता करण्यात आलेली नाही.कंत्राटी कामगारांना राज्य सरकारच्या विमा योजनेचा लाभ आणि वैद्यकिय सुविधा ही दिल्या जात नाहीत.अनेक कंपन्यात कामगारांचे ठेका घेणारे कंत्राटदार हे बहुतेक कारखान्यात काम करणारे कामगारच आहेत.त्यांच्याकडे ठेका घेण्याचा कोणताही परवाना नाही. त्यामुळे कंपनी मालकाबरोबर कोणत्याही प्रकारचा करार केला जात नाही.त्यातून मालक आणि ठेकेदार कामगारांची पिळवणूक करीत आहेत.

कामगार कायद्यानुसार फक्त २० टक्के कंत्राटी कामगार कामावर ठेवण्याची परवानगी असताना,अनेक कंपन्यांमध्ये ८० टक्के कामगार कंत्राटावर काम करीत आहेत.कंपनीत काम करताना अपघात झाल्यास सदर कामगारावर तात्पुरते उपचार कंपनीमार्फत केले जातात,त्यानंतर त्या कामगाराला घरी बसवले जाते,त्यामुळे त्याच्या आरोग्यासह रोजगाराचाही प्रश्न निर्माण होत आहे.कंपनी मालक आणि ठेकेदाराचा हा अन्याय केवळ रोजगार वाचवण्यासाठी कामगार करित आहेत. त्यामुळे हा मनमानी कारभार त्वरीत थांबवून कामगारांना न्याय मिळवून द्यावा. अशी मागणी कामगार नेते विनायक निकम यांनी पालघर मधील कामगार उपायुक्तांकडे केली आहे.

सर्वेक्षणाच्या नावाने लूट करणाऱ्या एजन्सीचे पितळ उघड

वसई, दि. २० प्रतिनिधी

मालमत्ता सर्वेक्षणासाठी पालिकेने नेमलेली एजन्सी आर्थीक लुट करीत असल्याचे उघड़ झाले असून,या एजन्सीचा ठेका तात्काळ रद्द करण्याचे निर्देश आमदार हितेंद्र ठाकूर यांनी पालिकेला दिले आहेत. वसई-विरार महापालिका हद्दीतील वाढीव मालमत्तांचा शोध घेण्यासाठी पालिकेने एका एजन्सीची नेमणूक केली होती.मागील काही वर्षांपासून शहरात अनेक वाढीव बांधकामे झाली होती. या बांधकामांना जुन्याच क्षेत्रफळा नुसार मालमत्ता कराची आकारणी करण्यात येत होती.शहरात १ लाख ४२ हजार इतक्या व्यावसायिक मालमत्ता आहेत.त्यामुळे मालमत्ता कर वाढीसाठी वाढीव मालमत्तांचा जीआयएस प्रणाली द्वारे सर्वेक्षण करण्याचा निर्णय पालिकेने घेतला होता. त्यासाठी खासगी एजन्सी नेमून मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार मागील वर्षी ऑगस्ट मध्ये मेसेर्स सीई इन्फो सिस्टीम लिमिटेड या कंपनीला देण्यात आले होते. जीआयएस प्रणाली द्वारे सर्वेक्षण करून मालमत्तेची डिजिटल छायाचित्रे जिओ-टॅगिंग,अंतर्गत व बाह्य मोजमाप आणि त्यांचे कार्पेट,बांधकाम क्षेत्र डिजिटल उपकरणाद्वारे मोजमाप करणे असे या कामाचे स्वरूप होते. मात्र ही एजन्सी सर्वेक्षणाच्या नावाखाली तडजोडी करत असल्याच्या तसेच औद्योगिक कंपन्यांकडून आर्थिक लूट करत असल्याच्या तक्रारी जनता दरबारात करण्यात आल्या होत्या.पालिका आयुक्त अनिलकुमार पवार,आमदार हितेंद्र ठाकूर आणि क्षितीज ठाकूर या जनता दरबाराला उपस्थित होते.पालिकेच्या खासगी एजन्सीकडून आर्थिक लूट होत असल्याचे कळल्यावर आमदार हितेंद्र ठाकूर संतप्त झाले.यापुर्वीही आमदार राजेश पाटील यांनीही सर्वेक्षणाच्या ही एजन्सी नावाखाली जुन्या ग्रामपंचायतीमधील घरांना वाढीव घरपट्टी आकारली जाते आणि ती तोडण्याची कारवाई केली जात असल्याचा आरोप जुलै महिन्यातील पावसाळी अधिवेनात केला होता.पालिकेत असलेल्या प्रशासकीय राजवटीचा ही एजन्सी गैरफायदा घेवून मनमानी पध्दतीने सर्वेक्षण करत असून सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरत असल्याचे ही आमदार पाटील यांनी सांगितले होते.त्यामुळे हे सर्वेक्षण तात्काळ थांबवावे घरांना लावलेली वाढीव घरपट्टी रद्द करावी अशी मागणी त्यांनी सभागृहात केली होती.परिणामी ही एजन्सी तात्काळ काढून टाका असे आदेश आमदार हितेंद्र ठाकूर यांनी पालिकेच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

मासळी व्यवसायात कोळी बांधवांना बरकत मिळू दे!

दर्यापूजन सोहळ्यात खासदार डॉ. हेमंत सावरा यांचे दर्याराजाला साकडे

विरार, दि. २० प्रतिनिधी

रक्षाबंधन आणि नारळीपौर्णिमा हे सण सोबतच येतात. रक्षाबंधन हा सण साजरा करत असलो तरी नारळी पौर्णिमेबद्दल बरीच उत्सुकता होती. नारळीभात खात होतो, पण नारळीपौर्णिमेला येण्याची संधी कधी मिळाली नव्हती. आज आपल्या आग्रहामुळे माझी इच्छा पूर्ण झाली,त्यासाठी मी आपल्या सर्वांचे आभार व्यक्त करतो, अशा शब्दांत पालघरचे

विद्यमान खासदार डॉ. हेमंत सावरा यांनी काळी बांधवांप्रति आपल्या सद्भावना व्यक्त केल्या. रक्षाबंधन व नारळीपौर्णिमेनिमित्त वसई पाचूबंदर येथे 'दर्यापूजन' सोहळ्याला ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते दर्यापूजन झाल्यानंतर त्यांनी उपस्थित कोळी बांधवांसोबत व्यासपीठावरून संवाद साधला. तत्पूर्वी मासळी व्यवसायात कोळी बांधवांना बरकत मिळू दे, म्हणून दर्याराजाला साकडे घातले.

समुद्रदेवतेची पूजा करू शकलो, यासाठी मी स्वत:ला भाग्यवान समजतो. आजपर्यंत सर्व देवतांची पूजा केली होती. आज आपल्या आशीर्वादाने व प्रेमाने समुद्रदेवतेची पूजा करण्याचा मान मिळाला, यासाठीही खासदार डॉ. हेमंत सावरा यांनी कोळी बांधवांप्रति ऋण व्यक्त केले. भारतमातेच्या जडणघडणीत कोळी बंधू-भगिनींनीचे महत्त्वाचे योगदान आहे, असे ते म्हणाले. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आरमार उभारणीत कोळी बांधवांच्या असलेल्या सहभाग आणि सहकार्याचा दाखला दिला. त्या माध्यमातून ऐतिहासिक वारसा लाभलेल्या कोळी बांधवांप्रति आदर व्यक्त केला. वादळ-वाऱ्यासोबत दोन हात करत कोळी बांधव आपला उदरनिर्वाह करतात,परंतु पावसाळ्यात व बदलत्या वातावरणामुळे जूनपासून बोटी बंद ठेवतात. या वर्षी तर त्यांनी अधिक १५ दिवस बोटी बंद ठेवल्या, यासाठी खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी त्यांचे कौतुक केले. डिझेल परतावा आणि मागील वर्षीचा मत्स्यदुष्काळ याला कोळी बांधवांना तोंड द्यावे लागले होते. कोळी बांधव मत्स्यदुष्काळासारख्या संक्रमणातून आज जात आहेत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. किमान मत्स्यदुष्काळात तरी सरकारने कोळी बांधवांसाठी मदत केली पाहिजे, यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून सरकार दरबारी मी प्रयत्न करेन, असे आश्वासन त्यांनी या वेळी दिले.

आज कोळी बांधवांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. खाडीचे पाणी गावात शिरते, नळाला चांगले-शुद्ध पाणी येत नाही. याशिवाय या ठिकाणी क्षेपणभूमीचा एक मोठा प्रश्न आहे. या क्षेपणभूमीसाठी अन्यत्र जागा मिळाली तर मासळी सुकवण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो. त्यामुळे आपले नुकसान हे आमचेही नुकसान आहे. हे सगळे प्रश्न सुटावेत, यासाठी राज्य व केंद्र सरकाच्या माध्यमातून भरीव तरतूद केली जावी, यासाठी मी प्रयत्न करेन, असे वचनही खासदार डॉ. हेमंत सावरा यांनी या प्रसंगी दिले.या दर्जापूजन सोहळयाला त्यांच्यासोबत व्यासपीठावर भाजपचे वसई निवडणूक प्रमुख मनोज पाटील, नंदकुमार महाजन, आयोजक अविनाश चवंडे व अन्य मान्यवर उपस्थित होते.

'अप्पी आमची कलेक्टर' च्या सेटवर डॉ.संदीप डाकवेंच्या अक्षरगणेशाची जादू

तळमावले, दि. २० प्रतिनिधी

अभिनेत्री श्वेता शिंदे यांच्या वज्र प्रोडक्शनची 'अप्पी आमची कलेक्टर' ही मालिका 'झी मराठी' वाहिनीवर सोमवार ते शुक्रवार रात्री 7.00 वाजता प्रसारित होत आहे. या मालिकेच्या सेटवर भेट देण्याची संधी शेतीमित्र डॉ.संदीप डाकवे यांना मिळाली. या मालिकेत प्रमुख भूमिका साकारणारे शिवानी नाईक (अप्पी), रोहित परशुराम (अर्जुन), साईराज केंद्र (अमोल सिम्बा), ज्योत्सना पाटील (मोना), पुष्पा चौधरी (मनीषा), दिग्दर्शक रोहित पवार यांना त्यांच्या मूळ नावात त्यांच्या समोर लाईव्ह अक्षरगणेशा रेखाटून डॉ.संदीप डाकवे यांनी भेट दिला. सेटवरील सर्व उपस्थितांनी डॉ.डाकवे यांच्या कलेचे कौतुक केले.

''आपण रेखाटलेला अक्षरगणेशा खूप सुंदर आहे, याची फ्रेम करुन मी घरी लावणार आहे, या अनोख्या भेटीबद्दल आपले मनापासून आभार..'' अशा शब्दात अभिनेता रोहित पुरुषोत्तम यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

दरम्यान, डॉ.संदीप डाकवे यांनी आपल्या वडिलांवर लिहलेल्या 'तात्या' या पुस्तकाची एक प्रत अभिनेत्री शिवानी नाईक यांना दिली. या पुस्तकाचे वाचन करुन सदर पुस्तकाचा अभिप्राय आपणास देते असे अभिनेत्री नाईक यांनी सांगितले.

अभिनेता रोहित पुरुषोत्तम यांनी दिलेल्या अनोख्या प्रेमाबद्दल डॉ.संदीप डाकवे व त्यांचे सहकारी भारावून गेले. एक कलावंत दुसऱ्या कलावंतांचा कसा आदर करतो याचे या निमित्ताने प्रात्यक्षिक पहायला मिळाले. रोहित पुरुषोत्तम यांच्यामुळे डॉ.डाकवे यांचा अन्य कलाकारांशी छान संवाद साधता आला. अभिनेते शिवराज फाटक, अमोल लोहार, शुभम दाभाडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

सेलिब्रिटीज किंवा अन्य मान्यवर यांना अक्षरगणेशा भेट देणे हा छंद केवळ न जोपासता त्या माध्यमातून सामाजिक जाणीवाही जपण्याचे काम चित्रकार डॉ. संदीप डाकवे यांनी केले आहे. अक्षरगणेशाच्या माध्यमातून आतापर्यंत लाखो रुपयांचा निधी गरजूंना दिला आहे.

यापूर्वीही त्यांनी विविध मालिका, चित्रपट यांच्या सेटवर जावून आपली कला सादर केली आहे. नाना पाटेकर, प्रशांत दामले, डॉ.गिरीश ओक, ऐश्वर्या नारकर, अविनाश नारकर, आदेश बांदेकर, डॉ.अमोल कोल्हे, वैभव मांगले, स्पृहा जोशी, अशोक शिंदे, रविंद्र बेर्डे, सुरेखा कुडची, महेश सलागरे, सुबोध भावे, अभिजीत खांडकेकर, अनिता दाते, मकरंद अनासपुरे, जयराज नायर, संजय नार्वेकर, सागर कारंडे, भाऊ कदम, प्राजक्ता माळी आदींसह विविध क्षेत्रातील सुमारे 14 हजाराहून अधिक मान्यवरांना कलाकृती दिल्या आहेत. ज्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड आणि वर्ल्ड ग्रेटेस्ट बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये तीनदा, हायरेंज बुक ऑफ रेकॉर्ड, आणि द ग्रेट इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड या पुस्तकांनी घेतली आहे.

डॉ.संदीप डाकवे यांना आता 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड' आणि 'गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड' खुणावत आहे. या रेकॉर्ड ला गवसणी घालण्याचे स्वप्न असल्याचे डॉ.डाकवे यांनी सांगितले आहे.

FOXCONN TO ASSEMBLE DEVICES SOON

Apple's made-in-India iPhone Pro & Pro Max are coming this year

Company is moving output to India to diversify beyond China

SANKALP PHARTIYAL
August 20

SHIFTING BASE

- Foxconn to start assembly soon after launch
- Series of training under way for Tamil Nadu workers
- India production boosted by Modi's incentives
- Apple diversifies from China due to risks
- India-made iPhone 16 to launch globally
- Pegatron and Tata may also make Pro models

$14 bn worth of iPhones made in India FY 2024

- Higher-end models have larger batteries, better cameras, and titanium bodies
- They need specialised production lines
- Apple, Foxconn, Pegatron, and Tata declined to comment

APPLE WILL MAKE the most expensive iPhone Pro and Pro Max models in India for the first time this year, a milestone for the US company and the Asian country's manufacturing sector.

Key partner Foxconn Technology Group will begin assembling the new marquee devices within weeks of their global launch this fall, people familiar with the matter said. It's begun training thousands of workers at a factory in southern Tamil Nadu state as it rushes to produce the iPhone 16 Pro and Pro Max as close to the global debut as possible, they said, asking not to be named as the information is private.

The production of Apple's entire iPhone range in India is a major landmark for the US tech giant's local push that started gathering steam in 2021, helped by Prime Minister Narendra Modi's financial incentives to attract high-end manufacturing.

Apple still makes the vast majority of iPhones in China, but it's gradually diversifying beyond the country to lessen risks related to tensions between Beijing and Washington.

The effort resulted in Apple assembling $14 billion of iPhones in India in the fiscal year through March 2024, accounting for as much as 14% of its global output. Like last year, Apple is expected to make the India-made standard iPhone 16 available on the same day the latest generation begins selling across the world, the people said.

Its other partners in the country — Pegatron Corp.'s India unit and the Tata Group — could also soon begin making the Pro versions, the people said. The higher-end models typically have bigger batteries, better cameras and titanium bodies, and they require more specialised production lines.

Representatives for Apple, Foxconn and Pegatron declined to comment, while Tata didn't respond to a request for comment.

India, the world's most populous nation, is also increasingly becoming an important market for Apple as its iconic devices are considered status symbols by the country's rising, aspirational middle class. Chief executive officer Tim Cook visited India last year to open the first two Apple stores in the country, where annual sales are approaching a record $8 billion.

Apple will export the bulk of the India-made Pro and Pro Max devices to Europe, the Middle East and the US as the demand for the pricier versions is relatively smaller in India, though the upcoming festive season could boost sales

—BLOOMBERG

For Lakshya Sen, it's going to be painful for a while as he charts his path forward

SHIVANI NAIK
New Delhi, August 20

AND THEN THE MOMENTUM SUDDENLY CHANGED, AND HE STARTED PLAYING BETTER

WITH LAKSHYA SEN, it's never about some streaky ray of hope. When he gets going in a big-stakes match at a big stage with his big booming, pacy game building up big leads, he makes the world look beatable. When he crashes down with a thud, a grandfatherly Bruce Banner coach turns into a Paris-rattling Hulk.

National coach P Gopichand had reckoned gold was within Sen's reach the way he put Viktor Axelsen under the pump to start the semis. It was because Sen's exceptionally sharp reading of the game had dialled up his anticipation, backing the Indian against Thai Kunlavut Vitidsarn, had Sen made Paris Games finals. Sen's own mentor Prakash Padukone was thoroughly scathing when the shuttler let go of a chance of a bronze medal, a day later, because the two wise men saw wild possibilities of an Indian man achieving the unprecedented, believing him capable. Alternate scenarios play out in their minds, and recurring regrets come with the job of sitting on the chair.

Sen, though, walks the post-Olympics equilibrium, like a tightrope. In Mumbai for a sponsor's event on Tuesday, he says, "Overall, in how I played, there were some things I was happy and proud about at Paris. But this is gonna hurt for some time," he says crispy, before adding, "I'm looking to add and change a lot of things moving forward." It's one of those 4th place finishes, whose conversion into a medal India will ride along with, in the coming years - the country has never turned 4th into a podium before.

In the bronze playoff against Lee Zii Jia, Sen was 21-13, 8-3 up, when the Malaysian prone to implosions, pulled a heist on the Indian. The lead, Sen indicates, had been unexpected, and to his eventual dismay, lulling. "In the second game, that side of the court had some drift. Even after the lead, I knew I couldn't control the shuttle. And then the momentum suddenly changed, and he started playing better. Even when he drew level, I was fighting for every point. But ..." he trails off, on what had been a stunning run to the brink of bronze, for a guy ranked 22nd.

It's a familiar pattern with Sen, at All England, and against Anders Antonsen and Jonatan Christie, over the course of his career, though he's nicked wins against both in latest battles. When he's aggressive and operating at peak pace, he looks stunningly in control. But if the pace drops a tad, and that happens in a blink, there's a significant drop in his game, where winning a big rally takes a toll on him.

Against Viktor Axelsen in the semis, 20-17 up, the Dane was on the ropes, hassled and taking forever to serve - a situation where Sen ought to have gone straight to the chair to hurry up the long framed opponent. But as is peculiarly recurrent with Sen, he allowed Axelsen to regroup, with no strong Plan B to drive the knife in, at the all-important endgame. Sen let the senior worm his way right back into the match, waiting for Axelsen to tire out, not quite pushing the attack, while the Dane simply bided his time, and switched gears.

Sen concedes Axelsen was far too solid towards the end, but also that he botched his chance. "I'm happy that my starting strategy was working well. But in crucial situations I could've played differently. I didn't play well at all in the end, and there were a lot of unforced shots (errors). I needed to be a bit more patient," he says, though some might argue he got a little too patient, ceding space to the European.

It was audacity that had brought Sen until here, earning the right to evict the defending champion in the semis. Axelsen is now double Olympic champion, but Sen needed to believe he could have dislodged the crown. He had held strong against Christie, the All England champion, and won more matches the pool stage. "There was a lot of time after the draw came out and I had a good group stage. After two matches, I had a good gameplan against Jonatan Christie," he recalls.

Crucially, he was prepared for a struggle. "I knew not everything will go my way, so I was focussed. My attack was sharp and defense strong so I could draw out errors from him. I just focussed on the next point," he says. It was the perfect example of piling on pressure as underdog - with the burden of Indonesian medal on Christie. Axelsen, many notches tougher, but nevertheless not immune to being brought under pressure, proved too mighty, as the big medal was gone.

Christie had been threatening to defy, but that's when Sen played the no-look, behind the back, backhand to nick the 18-19 situation. "We do play that in training. But I'm happy it came off here as a good shot in crucial time. The shuttle had actually gone past me, and I'll say this would be Backhand Shot No 4 on priority. But it was the only shot left as option in that situation," he says simply.

The freakishness of the no-look blindsided backhand where Sen swivelled and whacked his wrist behind the back, is in how rarely it amounts to anything good in the end. "There is a higher chance of making mistakes. And usually you don't get any advantage because the shuttle was still in play after Christie returned. I knew the shot went viral, but maybe it played its part in the mental bit..." Sen hinted, at breaking down the Indonesian.

Sen candidly says he's watched it "many times," but not searching for it specifically. "It just comes up a lot of times if I'm scrolling Insta reels," he says.

Between reels and reeling from the disappointment of the near-medal miss, Sen insists it's best to move on. From August 26-30, Sen will head to the Red Bull Athlete Performance Centre in Salzburg, Austria. Sen had undergone a precision challenge, and a 1 vs 4 reflex timer routine before the Olympics, but will head back to Europe for a detailed evaluation in ergometry (treadmill, rowing, cycling), lactate thresholds, oxygen spirometry (his VO2 Max was 69 heading into Games), and specific isokinetic tests for extremities, that will give detailed metrics on his reflex-heavy game. He will also be checked for injury risks by analysing his asymmetric movements, as well as a consult on mental training.

Sen relies heavily on fitness to play the game style he does, and he is keen to get started right away. A semblance of mental exhaustion that compounds when playing high pressure rallies, did fell him, despite being in peak shape. So he sees potential for getting even better. "I'm looking forward to collecting data on this, and focusing on the fitness side."

Serum Institute working on Mpox vaccine

GEETA NAIR
Pune, August 20

ADAR POONAWALLA, CEO, SERUM INSTITUTE OF INDIA

SERUM INSTITUTE OF INDIA IS CURRENTLY WORKING ON DEVELOPING A VACCINE FOR THIS DISEASE TO CATER TO MILLIONS OF LIVES THAT MIGHT BE AT RISK.

TO TACKLE THE Mpox outbreak and the global vaccine shortage, the Serum Institute of India on Monday it is currently working to develop a vaccine for mpox, with positive outcomes expected in a year.

"In view of the global health emergency declared due to Mpox outbreak, Serum Institute of India is currently working on developing a vaccine for this disease to cater to millions of lives that might be at risk," Serum Institute of India CEO Adar Poonawalla said in a statement.

Mpox, formerly monkeypox, is a viral disease transmitted through physical contact with an infected person, animal or contaminated objects. The World Health Organization (WHO) has said that only individuals at risk of exposure to Mpox should be considered for vaccination. Travellers who may be at risk, based on an individual risk assessment with their healthcare provider, may consider getting vaccinated.

The UN health agency recommends several vaccines for use against Mpox. However, it is currently not recommending mass vaccination like it was done during the COVID-19 global pandemic. The global health body recommends the use of MVA-BN (Modified Vaccinia Ankara-BavarianvNordic) or LC16 vaccines, or the ACAM2000 vaccine if other vaccines are not available.

Vaccines used against smallpox, ACAM2000 and JYNNEOS, are licensed in the US to protect against Mpox. JYNNEOS is also approved in the EU. ACAM2000, a second-generation vaccine from Emergent BioSolutions, is available for Mpox under an Expanded Access Investigational New Drug (EA-IND) protocol.